कोर्ट विद्यमान उपविभागीय अधिकारी, वर्धा यांचे कार्यालय

प्र.क्र. ५७/किर.-८०/२०१६-१७
मौजा :- नालवाडी

आदेश
(पारीत दिनांक ११/०४/२०१७)

अर्जदार **श्री सुरेंद्र रामचंद्र महाकाळकर** रा. गोपूरी, वर्धा यांनी या कार्यालयाला दिनांक १३/०१/२०१७ ला अर्ज करून त्यामध्ये नमुद केले की, मौजा **नालवाडी** येथिल सर्वे क्र. ३९ मधील भुखंड क्रमांक ३० व ३२ क्षेत्रफळ प्रत्येकी २७८.७१ व ४०४.१२ चौ.मि. एकुण ६८२.८३ चौ.मि. क्षेत्र वैयक्तिक कामाकरीता एकत्र करण्यास विनंती केली आहे.

प्रकरणात आक्षेप / हरकती मागविण्याकरीता जाहिरनामा या कार्यालयाचे पत्र क्र. सिरस्तेदार/उविअ/कावि-११४ दिनांक १६/०१/२०१७ अन्वये प्रसिद्ध करण्यात आला.

अर्जदाराचे अर्जाचे अनुषंगाने, नगर रचनाकार वर्धा, ग्रामपंचायत व तलाठी यांचा अहवाल या कार्यालयाचे पत्र क्र. सिरस्तेदार/उविअ/कावि-११३ दिनांक १६/०१/२०१७ अन्वये मागविण्यात आला.

प्रकरणात **नगर रचनाकार, वर्धा** यांनी त्यांचे पत्र क्र. ६३२ दिनांक ११/०४/२०१७ अन्वये सदर भूखंडाचे एकत्रिकरण करण्यास शिफारस केलेली आहे.

तलाठी नालवाडी यांचा अहवाल पत्र क्र. --- दिनांक ०३/०४/२०१७ अन्वये प्राप्त झाला आहे.

ग्रामपंचायत, नालवाडी यांनी पत्र क्र. १२३ दिनांक ३०/०३/२०१७ अन्वये अहवाल प्राप्त झाला आहे.

उपविभागीय अधिकारी वर्धा यांचे प्र.क्र. ३/एनएपी-३४/१९८२-८३ आदेश दिनांक २८/०२/१९८४ अन्वये अकृषक आदेश पारीत करण्यात आलेला आहे.

अर्जदार यांनी भूखंड क्र. ३० व ३२ यांची खरेदी श्री अजित लुनिया व इतर यांचेकडून दिनांक २१/११/२०१६ अन्वये नोंदणिकृत खरेदी केलेली आहे.

प्रकरणात अर्जदाराने सहपत्रित केलेली सर्व कागदपत्रे व प्राप्त नाहरकत या सर्व बाबींचा विचार करता मौजा **नालवाडी** येथिल भूमापन क्र. ३० व ३२ क्षेत्रफळ प्रत्येकी २७८.७१ व ४०४.१२ चौ.मि. एकुण ६८२.८३ चौ.मि. क्षेत्र नविन मंजूर नकाशाप्रमाणे एकत्रिकरण करण्यास परवानगी **श्री सुरेंद्र रामचंद्र महाकाळकर, साहस लँड अँड इन्फ्रा**

डेवलपर्स प्रा. लि. रा. गोपूरी वर्धा तह. जि. वर्धा यांना खालील शर्ती व अटींचे अधीन राहून प्रदान करण्यात येत आहे.

आदेश पारीत संबंधितांना कळवा.

शर्ती व अटी

१. सदर एकत्रिकरण फक्त **निवासी** वापराकरीता अनुज्ञेय राहील.

२. अर्जदाराने वाणिज्य वापराकरीता वेगळा अर्ज करून मंजूरी प्राप्त करून घ्यावी.

३. अर्जदाराला मूळ अकृषक आदेशातील सर्व अटी जशाच्या तशा लागू राहतील.

४. सदर क्षेत्राकरीता शासन मंजूर ब व क वर्ग नगर पालिकांकरीता लागू असलेली बांधकाम विकास नियंत्रण नियमावली लागू आहे. त्यामधील नियमांचे पालन करणे बंधनकारक राहील.

५. एकत्रिकरणाचे नकाशा व बांधकामास स्थानिक मंजूर प्राधिकरण / मा. जिल्हाधिकारी, वर्धा यांची परवानगी घेणे बंधनकारक राहील.

६. सदर जागेची मोजणी संबंधित विभागाकडून करून घेणे बंधनकारक राहील.

७. सदर जागेवर बांधकाम करतांना अर्जदाराला संबंधीत प्राधिकरणाकडून जागेचा नकाशा मंजूर करणे बंधनकारक राहील. तसेच त्यामधील अटींचे ततोतत पालन करावे लागेल.

८. सदर भूखंडाची खरेदी-विक्री व इतर करार होईल त्यावेळी हा आदेश व मंजूर एकत्रिकरण नकाशा विक्रीपत्र / कराराचा एक भाग म्हणून जोडण्यात यावा.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा

प्रतिलिपी :- १. तहसिलदार, वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव.

२. तलाठी नालवाडी तह. वर्धा यांना आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

३. अर्जदार **श्री सुरेंद्र रामचंद्र महाकाळकर, साहस लँड अँड इन्फ्रा डेवलपर्स प्रा.** लि. रा. गोपूरी, वर्धा तह. जि. वर्धा यांना माहिती तथा आवश्यक कार्यवाहीस्तव अग्रेषित.

उपविभागीय अधिकारी,
वर्धा

PROPOSED AMALGAMATION PLAN IN SR.NO. 39, PLOT NO.30 & 32 MOUZA - NALWADI TA. & DIST.-WARDHA



N

scale = 1: 500



AREA STATEMENT

PLOT BEFORE AMALGAMATION

AREA OF PLOT NO.30 = 278.71 Sqm.


AREA OF PLOT NO.32 = 404.12 Sqm.

PLOT AFTER AMALGAMATION

AREA OF PLOT NO.30 & 32 = 682.83 Sqm.

PLOT BEFORE AMALGAMATION
SCALE 1:500

PLOT AFTER AMALGAMATION
SCALE 1:500



N

SITE PLAN.
SCALE 1:5000

AMALGAMATION PLOT NO.30 & 32

नगर रचना व मुल्यनिर्धारण विभाग
वर्धा कार्यालय वर्धा
नकाशावर काळ रंगाने दुरुस्ती केलेला असावे व
कार्यालयाचे पत्र क्र. [illegible] दि. 23/8/2016 असावे
सर्वे ८३२ दि. 23/8/2016 असावे
प्रतीवुतार निवासी वाणिज्यीक
मंजुरीसाठी शिफारस (Recommended for Approval)
करण्यात येत आहे

नगर रचनाकार
वर्धा

मंजुरी आदेश-
(नगर रचनेने सूचीलेखा दस्तांचे आधारे)
या कार्यालयाचे प्रकरण क्र. किरकोळ ००/५५/२०१७
आदेश दिनांक 23/8/16 अन्वये सदर भूखंडाचा
[illegible]
आहे.

सहायक संचालक नगर रचना
वर्धा

S.C.GHUDE
Civil Engineer
WARDHA
Reg.No.TPW/029/2016

OWNER SIGN.

ENGINEER SIGN.